




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा

Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २१८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२१ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## अखेर रुपाली चाकणकरांचा होणार राजीनामा ?

# मुख्यमंत्र्यांचे आदेश; भोंदुबाबाचे प्रकरण भोवलं

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, मुंबई :** नाशिकमधील ज्योतिषी अशोक खरातला एका महिलेचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. त्यानंतर आता या अशोक खरातचे अनेक कारनामे समोर आले आहेत. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे खरात सोबतचे फोटो आणि त्याची पाद्यपूजा करतानाचा व्हिडिओ समोर आला होते. त्यानंतर त्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत होती. अशातच आता रूपाली चाकणकरांनी राजीनामा द्यावा असे आदेश मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.



### राजीनामा देण्याचे आदेश !

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे अशोक खरात सोबतचे फोटो आणि त्याची पाद्यपूजा करतानाचा व्हिडिओ समोर आला होता. यामुळे चाकणकरांवर टीका करण्यात येत होती. विरोधकांनी चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी केली केली आहे, त्यामुळे आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चाकणकरांना राजीनामा देण्याचे आदेश दिले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

### अशोक खरातचा पाय आणखी खोलात...

नाशिक पोलिसांना अशोक खरात प्रकरणात मोठं यश मिळालं आहे. कॅप्टन खरातचं बिंग फोडणाऱ्या नीरज जाधवला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. तो सध्या नाशिक पोलिसांच्या क्राइम ब्रांच शाखेच्या ताब्यात आहे. नीरज जाधवच्या विरोधात शिर्डीत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पीडित मुलीला तिचे मॉर्फ व्हिडीओचे स्क्रीनशॉट्स पाठविल्या प्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. नीरज जाधवनेच कॅप्टन खरातच्या केबिनमधील सीसीटीव्ही फुटेज बाहेर आणल्याचा संशय आहे. त्यामुळे आता त्याला ताब्यात घेण्यात आले असून त्याची कसून चौकशी केली जाणार आहे. यातून अशोक खरातच्या आणखी कारनाम्यांची माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

### रोहित पवारांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार...

आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले की, मा.मुख्यमंत्री साहेबांनी महिला आयोगाच्या अध्यक्षांना राजीनामा देण्याचे आदेश दिल्याचे समजत आहे, याबाबत मुख्यमंत्र्यांचे आभार, परंतु केवळ राजीनामा घेऊन चालणार नाही तर या प्रकरणाच्या तळाशी जाऊन पारदर्शक चौकशी करावी आणि आ. अमोल जी मिटकरी म्हणत असल्याप्रमाणे अजितदादांच्या अपघाताशी या भोंदू बाबाचे कनेक्शन आहे का? याचाही तपास व्हायला हवा.

### भोंदूगिरी करणारे सर्वच जेरबंद होतील – बावनकुळे

नाशिकमध्ये बलात्कार प्रकरणांमध्ये पोलिसांनी अशोक खरातला अटक केली आहे. यावर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना विचारले असता त्यांनी म्हटले की, 'या प्रकरणात जे कोणी दोषी असतील त्या सर्वांवर कारवाई सरकारच्या वतीने करण्यात येईल आणि सर्व दोषींना जेरबंद करण्यात येईल. तसेच अशा पद्धतीने अनेक भोंदू बाबा आश्रम उघडतात त्यामध्ये काय कार्य करतात हे अनेक वेळा पोलिसांना देखील माहित नसते असेही बावनकुळे म्हणाले.

# राज्य हादरले!

## लैंगिक शोषणाचे ५८ नाहीतर इतके व्हिडिओ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, नाशिक :** नाशिकमधील भोंदू अशोक खरात याच्या करानाम्याने राज्य हादरले आहे. त्याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप करण्यात येत आहे. एका पीडितेने त्याच्याविरोधात तक्रार दिल्यानंतर त्याचे बिंग फुटले. तर त्याचे अनेक राजकीय पुढाऱ्यांशी लागेबंध समोर आले आहे. त्याच्यासोबत अनेक मंत्री, आमदारांचे फोटो समोर येत असल्याने वातावरण तापले आहे. दरम्यान त्याच्या लैंगिक शोषणाचे ५८ व्हिडिओ हाती लागले होते.पण हा आकडा आता वाढला आहे. त्यामुळे याप्रकरणाचे जाळे दूरपर्यंत असल्याचे समोर येत आहे.

**➤ ५८ नाहीतर १०० पेक्षा अधिक व्हिडीओ!**

नाशिकचा भोंदू अशोक खरात याने महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. या लैंगिक शोषणाचे ५८ नाहीतर १०० पेक्षा अधिक व्हिडीओ असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. नाशकात सुरू असलेल्या SIT च्या बैठकीतील पोलीस सूत्रांनी ही माहिती दिली आहे. खरातची झाडाझडती सुरू असून त्यातून अनेक धक्कादायक बाबी समोर येत आहे. काल नाशिकमध्ये अजून काही पीडितांनी त्याच्याविरोधात तक्रार दिल्याचे समजते.

**➤ खरातच्या झाडाझडतीत अजून काय काय?**


याप्रकरणी राज्य सरकारने खास एसआयटी स्थापन केली आहे. त्यात लैंगिक शोषणाचे ५८ नाहीतर १०० पेक्षा अधिक व्हिडीओ असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. नाशकात सुरू असलेल्या एसआयटी च्या बैठकीतील पोलीस सूत्रांनी ही माहिती दिली आहे. नाशकात IPS तेजस्विनी सातपुतेंच्या उपस्थित बैठक सुरू आहे. आरोपी कॅप्टन अशोक खरातवर लैंगिक शोषणाचे आरोप आहेत. खरातच्या झाडाझडतीत २ लॅपटॉप, ८ लाखांची रोकड, पिस्तुल, जीवंत काडतुसे आणि मालमत्तांची कागदपत्रे मिळाली आहे.

**➤ नीरज जाधव मास्टरमाईंड...**

शिर्डी प्रकरणातील आरोपी नीरज जाधवने हे व्हिडीओ काढल्याचा संशय आहे. एसआयटी च्या पथकात नाशिक शहर आणि ग्रामीण पोलीस दलातील १२ वरीष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. कॅप्टन खरात प्रकरणात दाखल ३ गुन्ह्यांचा वेगाने तपास सुरू आहे. व्हिडीओतुन तांत्रिक विधीच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण करत असल्याचं समोर आले आहे. याप्रकरणात अजून पीडिता समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## चंद्रपुरातील जलनगर परिसरात मेफेड्रोनसह ३.५५ लाखांच्या मुद्देमालासह आरोपी ताब्यात

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२०, चंद्रपूर :** स्थानिक गुन्हे शाखेने अमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत ५५.०९ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) ड्रग्ज पावडरसह एका आरोपीस ताब्यात घेतले असून सुमारे ३ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २० मार्च २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे जलनगर वार्ड परिसरात सापळा रचण्यात आला. यावेळी आरोपी माधव नारायण मामीड (वर्ष), रा. जलनगर वार्ड, चंद्रपूर यास संशयावरून ताब्यात घेण्यात आले. त्याच्या झडतीदरम्यान त्याच्याकडून ५५.०९ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) ड्रग्ज पावडर तसेच एक दुचाकी (ज्युपीटर) क्रं. एमएच ३४ बीएन ४८६१ असा एकूण अंदाजे ३ लाख ५५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी चंद्रपूर शहर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायदा १९८५ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीस पुढील तपासासाठी पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचा नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक विनोद भुरले, सुनील गौरकर, पोहवा सुभाष गोहोकर, सतीश अवथरे, रजनीकांत, दिपक डोंगरे, इम्रान खान, सचिन गुरनुले, पोअं हिरालाल गुप्ता, शशांक बादमवार, किशोर वाकाटे व अजीत शेंडे यांनी केले.

## पुढील ४८ तासांमध्ये महाराष्ट्रावर मोठं संकट

**दि.२०, मुंबई :** महाराष्ट्रावर अवकाळी पावसाचं संकट कायम आहे, यामुळे आता शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. गेल्या चार ते पाच दिवसांमध्ये राज्यातील अनेक भागात गारपीटीसह पावसानं हजेरी लावली आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. दरम्यान भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढील तीन ते चार दिवस गारपीटसह पावसाचं संकट काय आहे. २१ मार्च ते २५ मार्च दरम्यान राज्यातील अनेक भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्य स्वरुपाच्या पवासाची शक्यता आहे. उत्तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भात काही जिल्ह्यात गारपीटसह अवकाळी पावसाची शक्यता आहे. तर काही ठिकाणी तुरळक पाऊस पडल्यानं ढगाळ वातावरणाची निर्मिती झाली आहे. पुढील दोन दिवस विदर्भात अवकाळी पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाच्या नागपूर केंद्राकडून वर्तवण्यात आला आहे. तर काही भागात गारपिटीची देखील शक्यता आहे. गेल्या आठवड्यामध्ये विदर्भात उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला होता. या काळात विदर्भातील बहुतांश जिल्हाचे तापमान ४० डिग्रीच्यावर गेले होते. अती तीव्र उष्णतेचा परिणाम नागरिकांच्या दैनंदिन कामकाजावर देखील झाल्याचं पहायला मिळालं. मात्र याचदरम्यान अवकाळी पावसानं हजेरी लावल्यानं नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. विदर्भाच्या वातावरणात द्रोनीका (अप्पर टफ वे) तयार झाली आहे, त्यामुळे २२ मार्चपर्यंत विदर्भातील बहुतांश भागात अवकाळी पावसासह गारपीट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, अशी माहिती नागपूर हवामान विभागाचे शास्त्रज्ञ प्रवीण कुमार यांनी दिली आहे.

# विंचूर पोलीस चौकीसमोरच दोन तरुणांमध्ये थरार !

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील पोलीस चौकीच्या अगदी समोर आणि वर्दळीच्या मुख्य रस्त्यावर दोन तरुणांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. भरदिवसा घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, विंचूरमधील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

**नेमकी घटना काय?**

विंचूर पोलीस चौकीच्या समोरील मुख्य रस्त्यावर, श्री दत्त हॉटेलच्या जवळ ही घटना घडली. व्हायरल झालेल्या व्हिडिओनुसार, दोन तरुण किरकोळ कारणावरून किंवा जुन्या वादातून एकमेकांशी भिडले. सुरुवातीला शाब्दिक चकमक झाली आणि पाहता पाहता त्याचे रूपांतर भीषण हाणामारीत झाले. दोन्ही तरुणांनी एकमेकांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करत अक्षरशः रस्त्यावर ओढले.

**नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण**

पोलीस चौकी अगदी हाकेच्या अंतरावर असतानाही तरुणांनी अशा प्रकारे कायदा हातात घेतल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. ही हाणामारी सुरू असताना रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांमध्ये घबराट पसरली होती. काही प्रत्यक्षदर्शींनी धाडस दाखवत ही भांडणे सोडवण्याचा प्रयत्न केला, ज्याचे चित्रणही व्हिडिओमध्ये दिसत आहे.

### भरदिवसा एकमेकांना लाथाबुक्क्यांनी तुडवले...

**कारवाईकडे सर्वांचे लक्ष...**

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. पोलीस चौकीसमोरच हा राडा झाल्याने स्थानिक नागरिक संताप व्यक्त करत आहेत. जर पोलीस चौकीसमोरच लोक सुरक्षित नसतील, तर दाद कोणाकडे मागायची? असा सवाल उपस्थित केला जात आहे. या प्रकरणी पोलीस आता संबंधित तरुणांवर काय कठोर कारवाई करतात, याकडे संपूर्ण विंचूर परिसराचे लक्ष लागले आहे.

# जनतेच्या सेवेसाठी विकासकामांची सुरुवात : आ.काशिनाथ दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात विकासकामांची दमदार घोडदौड सुरू असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित करत आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत जवळे येथे तब्बल १ कोटी ५७ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन पार पडले. या कार्यक्रमाला विविध मान्यवरांसह ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून विकासाबाबत समाधान व्यक्त केले.



यावेळी बोलताना आमदार दाते सर म्हणाले, जवळे गावाला मी नेहमीच विकासाच्या बाबतीत झुकते माप दिले आहे. जिल्हा परिषद सभापती असताना देखील कोट्यवधी रुपयांचा निधी दिला होता आणि आज पुन्हा १.५७ कोटींच्या कामांचा शुभारंभ करत आहोत. जनतेच्या सेवेसाठी विकासकामांची नवी सुरुवात असुन आमचे काम केवळ पाट्या लावणे नसून प्रत्यक्षात दर्जेदार कामे पूर्ण करणे हेच आमचे ध्येय आहे. मतदारसंघातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठीही या मतदारसंघाचा लोकप्रतिनिधी म्हणुन मी सातत्याने प्रयत्नशील असून, कुकडी डावा कालवा आवर्तन वेळेवर मिळावे यासाठी वेळोवेळी पालकमंत्री व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा सुरूच असतो असेही त्यांनी यावेळी नमूद केले. तसेच पारनेर तालुक्यातील शेतीच्या सिंचन व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी विविध पाणी योजनांच्या मंजुरीसाठीही सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

फक्त विकासकामेच नव्हे, तर मतदारसंघात शांतता व सुव्यवस्था राखण्याचे कामही प्राधान्याने केले असल्याचे सांगत त्यांनी, विकास आणि शांतता हीच प्रगतीची दोन चाके आहेत,असे मत व्यक्त केले. राज्याच्या अर्थसंकल्पातून रस्त्यांच्या कामांसाठी जवळपास ४१ कोटी रुपयांचा निधी मिळविण्यात यश मिळाले, ही बाब त्यांनी विशेषत्वाने अधोरेखित केली.

यावेळी जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, भाजप राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, कार्याध्यक्षा सुधामती कवाद, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, जिल्हा उपाध्यक्ष आर. एस. कापसे, युवा तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, सरपंच पंकज कारखिले, सुरेश बोरुडे, सुभाष दुधाडे आदी मान्यवर उपस्थित होते.




## चिमण्यांसाठी एवढे कराच!

दरवर्षी २० मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिवस म्हणून साजरा केला जातो. यावर्षीही हा दिवस जगभर उत्साहात साजरा केला गेला. चिमणी या चिमुकल्या पक्षासाठी व त्याचा संरक्षणासाठी हा दिवस साजरा केला जातो. झपाटयाने कमी होणारी चिमण्यांची संख्या लक्षात घेऊन २० मार्च जागतिक जागतिक दिवस म्हणून साजरा केला, तसेच येणाऱ्या पिढीला चिमणी हा पक्षी माहीत असावा या उद्देशाने हा दिवस चिमणी दिवस म्हणून घोषित करण्यात आला. भारतात सर्वात जास्त माहीत असणारा पक्षी म्हणून चिमणी परिचयाची आहे. पूर्वी गल्लीबोळात, बाल्कनीत, गच्चीवर, झाडावर दिसणाऱ्या व मानवी वस्तीत मुक्त संचार करणाऱ्या चिमण्या आज दिसेनाशा झाल्या आहेत. अन्य पशुपक्ष्यांप्रमाणे चिमण्यांचे अस्तित्वही धोक्यात आले आहे. सहा महिन्यातून एकदा दोन चार अंडी घालणाऱ्या चिमण्यांना मिलन काळात मातीची गरज असते. पण मातीची जागा आता सिमेंटने घेतली आहे. सिमेंटच्या जंगलामुळे व वाढत्या वृक्षतोडीमुळे चिमण्यांचा अधिवास नष्ट झाला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. विशेषतः शहरांमध्ये मोबाईल टॉवर्समधून होणारे विद्युत चुंबकीय उत्सर्जन, आधुनिक प्रकारच्या घरबांधणी पद्धतीमुळे घरट्यांच्या जागांची अनुपलब्धता, अन्नाची उपलब्धता, शहरांमधील वाढते प्रदूषण तसेच शेतात होणारा रासायनिक खते व कीटकनाशक यांचा वापर यासारख्या अनेक कारणांमुळे चिमण्यांची संख्या झपाटयाने कमी होत आहे. २० मार्च हा दिवस चिमण्यांच्या संख्येबद्दल लोकांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी साजरा केला जातो. चिमण्यांची घटती संख्या अशीच कायम राहिली तर येणाऱ्या पिढीला चिमणी केवळ चित्रांमधूनच पाहता येईल. पक्षी हा मानवी जीवनातील अविभाज्य घटक आहे. सकाळी आपल्याला झोपेतून उठवणाऱ्या कोकिळेपासून चिमण्यांचा किलबिलाटापर्यंत सारे पक्षी आपला सारा दिवस आनंददायी जावा यासाठी आपल्या कानावर आणि मनावर नादमधुर संगीताचे स्वर उमटवीत असतात. जसे हिरवेगार झाडे बघून मन प्रसन्न होते, तसेस पक्ष्यांमुळे मन आनंदी होते त्यासाठी पक्ष्यांचे अस्तित्व टिकवणे महत्वाचे त्यासाठी प्रत्येकाने आपल्या घराच्या गच्चीत, बाल्कनीत, छपरावर कृत्रिम घरटी ठेवावीत. त्यात ज्वारी, बाजरी, गहू यासारखी धान्ये ठेवावीत. बाल्कनीत, गॅलरीत मातीच्या भांड्यात पाणी ठेवल्यास ते चिमण्यांना पिण्यास मिळेल व त्यांना उन्हाळ्याची झळही बसणार नाही. केवळ चिमणी दिवस साजरा करुन चिमण्या परत येणार नाहीत याचा विचार व्हावा.

**– श्याम ठाणेदार**

## भव्य भारत औधोगिक विकास योजना रोजगार निर्माण करणार

केंद्र सरकारने देशातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी ३३६६० कोटी रुपयांची योजना नुकतीच कार्यान्वित केली आहे. या योजनेअंतर्गत सुमारे १०० प्लेग अँड प्ले पार्क विकसित केले जाणार आहेत. या योजनेअंतर्गत जागतिक दर्जाची सुविधा उभारून उत्पादन क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. या योजनेमार्फत १०० ते १००० एकर क्षेत्रातील औधोगिक पार्क विकसित केले जाणार आहेत. ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. औद्योगिक पार्क मध्ये अंतर्गत रस्ते, पाणी व ड्रेनेज व्यवस्था तसेच आय टी सी व्यवस्था दिली जाईल. युनिट टेस्टिंग, फॅक्टरी टेस्टिंग लॅब, वेअरहाऊस इत्यादी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. प्रत्येक एकरासाठी एक कोटी पर्यंत मदत दिली जाणार आहे.

या योजनेमुळे पायाभूत सुविधा निर्माण होतील तसेच उत्पादन खर्च कमी होईल. कामकाज अधिक कार्यक्षम होईल. विशेष म्हणजे या योजनेमुळे देशात १५ लाख रोजगार निर्माण होतील. या योजनेचे थेट लाभार्थी एमएसएमई, गुंतवणूकदार, उत्पादन उधोग व स्टार्टअप्स हे असतील. या योजनेमुळे औधोगिक क्षेत्राला मोठी गती मिळणार असून देशात अनेक रोजगार निर्मिती होणार आहे. नरेंद्र मोदी यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेतला असून त्याची कार्यवाही त्वरित होणार आहे. ही योजना औद्योगिक विकासाला निश्चितच चालना देईल. यामुळे तरुणांना रोजगार तर मिळतीलच या शिवाय काही तरुण उधोग स्थपण्याचा विचार करतील. देशात विकासाचे वातावरण तयार दृष्टीने ही योजना अतिशय उपयुक्त आहे.

**– शांताराम वाघ, पुणे.**

# गावाकडील जीवनशैली -सडा-सारवण...



**– विनोद जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

खेड्यातील राहणीमान साधे असले तरी, तेथील जीवन जगण्याची पद्धत अतिशय आदर्श असते. तेच खरे संस्कृती जपण्याचे ठिकाण असते. तेथील घरे, अंगणं, रस्ते ही गावाकडच्या मातीशी जुळलेले असतात.घराच्या घराच्या भिंती ह्या मातीचा असतात.रोड, रस्ते सुद्धा मातीचेच असतात. घरासमोर भव्य अंगण असते. अंगणामध्ये तुळशी वृन्दावन असते. त्यामुळे घरामध्ये संपन्नता दिसून येते.सध्या खेड्यापाड्यातील परिस्थितीही बदलतांना दिसून येत आहे. मात्र अजूनही काही खेड्यात जुन्या पिढीतील माणसं आहेतच.खेड्यातील लोकजीवन आहे तेच आहे आणि जीवनशैली सुद्धा..! गावाकडील काही घरे अजूनही मातीचे आहेत, मात्र गेल्या वीस ते पंचवीस वर्षा अगोदर त्याहूनही परिस्थिती वेगळीहोती.

सकाळी झोपेतून उठल्यावर खेड्यातील दिनाचर्ये पैकी महिलांसाठी सर्वप्रथम कार्य म्हणजे सर्व घर व अंगण झाडूने झाडणे. विशेषत: अंगण हे तुराटीच्या काड्यांपासून बनवलेल्या खराट्याने झाडले जायचे. त्यानंतर गाईच्या शेणापासून सकाळी सडा शिंपडणे. गावातील भाषेत या वेळेला राम-प्रहरम्हणतात अर्थात माता-भगिनी सकाळी सूर्योदयापूर्वी उठायच्या. चूल पेटवून अंघोळीसाठी गरम पाणी ठेवायच्या. ऋतू कोणताही असो हा त्यांचा नित्यनेम..! बापमाणूस गाई वासरांचे शेण-पाणी करण्यासाठी व दूध काढण्यासाठी शेतावर निघून जायचे.आम्ही लहान मुलं अंथरुणात लोळत पडलेलो असायचो. मात्र तेही सूर्योदयापर्यंतच...! आईची चूल पेटवून झाल्यावर लोखंडाच्या बादलीमध्ये बादली भरून रांजणातून पाणी घ्यायची.त्यामध्ये वावरातून येतेवेळेस आणलेले गाईचे शेण हाताने मिक्स करायची. त्याला मस्तपैकी चुरगाळून घेतल्यावर ते पाण्यात एकजीव होऊन जायचे. त्या पाण्याचा रंग हा गडद हिरवट किंवा मेहंदीच्या रंगाचा व्हायचा. त्या लोखंडी बादलीमध्ये शेतात औषधे फवारणी दरम्यान वापरलेल्या ऐन्ड्रनच्या प्लास्टिकच्या डब्याचा वरील भाग कापून मगासारखे बनवायची. त्याने सर्व अंगणभर सडा शिंपडायची. मातीच्या त्या अंगणभर शिंपलेल्या शेणाच्या सड्याचा खूप सुंदर वास यायचा. त्यातून एक आगळीवेगळी ऊर्जा निर्मिती व्हायची. शिंपलेल्या सड्या सड्यामुळे वातावरण प्रसन्न वाटायचे. अंगणाच्या अगदी कानाकोपऱ्यापर्यंत हा सडा अगदी शोभून दिसायचा. तुळशी वृंदावनाच्या बाजूला एक दोन बाय दोन आकाराच्या मातीचा एक पाटासारखा ओटा बनवलेला असायचा, त्या ओट्यावर आई तळहाताने बादलीतील तळाशी साचलेल्या घट्ट शेणाने हलके- हलके सारवून घ्यायची. तो भाग सड्यासारखा ओबडधोबड नसायचा. आई त्यावर छान ठिपक्यांची रांगोळी काढायची. काही निवडक रंगच रांगोळीत असायचे.विशेषता पांढरी रांगोळी बहुप्रमाणात असायची. त्यावर लाल भडक कुंकू, पिवळी हळद बोटाने शिंपडायची. त्यामुळे रांगोळी अतिशय शोभून दिसायची. बाजूलाच श्रीराम, राम कृष्ण हरी, श्री विठ्ठल हे देवाचे नाव लिहायची. जसे मन होईल त्या दिवशी भगवंताचे कुठलेही नाव लिहायची. त्यांच्या दोन्ही बाजूला दोन दोन उभ्या रेषा मारायची. त्यामुळे ते अजूनच खुलून दिसायचे. हे सडा मार्जन गल्लीतील सर्व आया बहिणी सकाळीच लवकर उठून करायच्या. जवळपास सगळ्यांचीच वेळ ही तीच..! रामाचा राम प्रहर..! त्या शांत वातावरणात मंदिरातील घंटानाद मनमोहून टाकायचा. तो मंजुळ आवाज अजूनही कानात घुमतो. जुन्या आठवणी व खेड्यातील संस्कृती आणि लोकजीवनाची आठवण करून देतो.

गावाकडील मातीच्या अंगणातील शोभून दिसणाऱ्या सड्याबरोबर पूर्वीच्या मातीच्या घरातील तळभाग हा शेणाने सारवायचे.त्याचप्रमाणे पांढऱ्या मातीने भिंती सारवायचे त्याला पोतारा घेणे सुद्धा म्हणतात. भिंतीला तडा गेल्यास त्यामध्ये माती भिजवून घट्ट झालेल्या मातीच्या गोळ्याने भिंतीला गेलेल्या त्या तडा, चिरा बुजायचे त्याला लिपन करणे म्हणायचे. त्यापैकी मातीच्या घरातील तळभाग हा गायीच्या शेणाने सारवण्याची पद्धतही सुद्धा अतिशय कौशल्याची, मेहनतीची असायची. सड्याप्रमाणे घरातील तळभाग हा दररोज सारवल्या जात नव्हता कारण, त्याला बराच वेळ लागायचा.आठवड्यातून एक दोन वेळेस ही सारवण्याची क्रिया व्हायची अर्थात हे तळघर खराब झालेल्या अवस्थेवरून कळायचे. ते आया बहिणींना अगदी व्यवस्थित कळायचं. त्यादृष्टीने त्या ते सारवण्याचे काम करायच्या.

सारवण करण्यासाठी एका भांड्यामध्ये किंवा बादलीमध्ये गाईचे शेण कालवून घेतले जायचे किंवा एका जर्मरच्या मोठ्या पातेल्याचा वापर व्हायचा. त्यामध्ये जुन्या सुती लुगड्याचा एक कापड की जो, हातामध्ये व हाताच्या मुठीमध्ये सर्व बसेल व काही भाग मोकळा राहील जेणेकरून तो शेणाच्या पाण्यात बुडवून जमिनीवर फिरवल्यास त्याने सारवण्यास मदत होईल. त्या कापडाला पोतरा म्हणायचे. आई सारवायला सुरुवात करायची ते घराच्या आतील चुलीपासून ते मुख्य दरवाजापर्यंत, कारण सारवत सारवत मागे मागे यावे लागायचे. घर सारवतांना तो पोतारा पाण्यात कालवलेल्या शेणात बुडवायची. दोन्ही पायावर उक्कड बसून अर्धचंद्राकार अर्थात इंद्रधनुष्याच्या आकारासारखं सारवत सारवत मागे-मागे सरकायची. ताज्या- ताज्या सारवलेल्या घराचा अतिशय सुंदर वास यायचा. हातातील पोतारा परत पाणी आणि शेणाच्या कालवणामध्ये बुडवून संपूर्ण घरभर मुख्य दरवाजापर्यंत



सारवल्यावर घर अतिशय सुंदर, शोभून दिसायचं. ताज्या-ताज्या सारवण्यावर बसल्यावर जणू काही एक वेगळी ऊर्जा निर्मिती व्हायची.ही एक आगळीवेगळी शक्ती होती. ती कायम स्मरणात राहील. हे ऋतुमानानुसार आरोग्यास उपयुक्त होते. उन्हाळ्यामध्ये सारवलेल्या जागेवर बसल्यास थंडगार वाटायचे तर, हिवाळ्यामध्ये उबदार वाटायचे कारण, कारण ही त्या गावाकडच्या मातीतील अन गाईच्या शेणाची शक्ती व त्याचबरोबर आईच्या मायेचा ओलावा होता. हल्लीच्या या उच्चदर्जांच्या फरशा सुद्धा या सारवण्यापुढे फिक्या पडतात कारण, ह्या फरश्या उन्हाळ्यात अतिगरम तर हिवाळ्यात थंडगार पडतात कारण त्यात मायेचा ओलावा कुठे आहे?

गावाकडील घराच्या या सडा सारवणाबरोबर घराच्या भिंती ह्या पांढऱ्या शुभ्र मातीने पोतरल्या जायच्या. भिंती पोतारने तेवढे सोपे काम नव्हते म्हणून, घराच्या भिंती ह्या फक्त सणासुदीला पोतारायचे कारण सर्व घराच्या भिंती रंगवणे हे घराच्या आकारानुसार लक्षात घेता दोन ते चार दिवस लागायचे. घराच्या भिंती पोतारणे एक प्रकारची गावाकडील घरांची रंगरंगोटीच होती. या मातीच्या भिंत पोतरण्यासाठी शेणाऐवजी पांढरीशुभ्र माती वापरली जायची. हे मातीचे ढेकळं विशेषता मातीच्या गढीच्या ठिकाणी सापडायचे.म्हणून ते दहा पाच ढेकळ जमा करून ठेवावे लागायचे. आई त्या पांढऱ्या मातीच्या ढेकळांना पाण्यामध्ये भिजवून ठेवायची. जसा घरातील तळभाग सारवायची तसाच भिंतीना पोतारायची. मात्र भिंती पोतारण्यासाठी आईची खूप कसरत व्हायची. कारण हे तासंतास लाकडी स्टूलवर उभे राहून किंवा जाड लोखंडी पत्राच्या डब्यावर उभे राहून पोतारावे लागायचे, कारण घराच्या भिंती या उंच असायच्या.घराला छत म्हणून लोखंडी टीनपत्रे किंवा मातीचे धाबे असायचे. उभे राहून सारवल्यामुळे पाणीमिश्रित मातीचे थेंब सर्व अंगावर पडायचे, म्हणून आई डोक्याला एखादं कापड बांधून घ्यायची. मात्र चेहऱ्यावर एखाद्या रंगाऱ्याप्रमाणे पांढऱ्या मातीचे शिंतोडे उडायचेच. या मातीतही माय सारखाच मायेचा ओलावा होता. गावाकडची माती आणि जन्मदात्री माय यांच्या आभाळभर मायेचा ओलावा सारखाच...!

कारण त्यांनीच आम्हांला संस्कारशील बनवले. मातीच्या भिंती सारवतांना इतका सुंदर सुवास यायचा की जणू, त्याला जिभेने चाखावं आणि हो आम्ही लहान असताना चाखायचो सुद्धा...! हल्ली शरीरातील कॅल्शियम वगैरे कमी झाल्यास मेडिकलमध्ये मातीचे खडे भेटतात. ती आम्ही लहान मुलं व विशेषता गर्भवती महिला ह्या मातीच्या पोतऱ्यातून खायचो, चाखायचो. अशी शक्ती या गावाकडच्या मातीमध्ये होती व अजूनही आहे. घराच्या मातीच्या भिंती पूर्ण पोतारून झाल्यावर घर अगदी चमचमीत दिसायचं घरात प्रसन्न वाटायचे. पांढऱ्या मातीच्या रंगाने एक आगळी वेगळीच चैतन्यमय अनुभूती यायची.

अशा प्रकारे गावाकडील हे अंगणातील सडा व घरातील तळभाग, भिंती सारवणे व पोतारणे बहुअंगांनी आपल्या संपूर्ण कुटुंबासाठी आरोग्यदायी होते. त्यातून सकारात्मक ऊर्जानिर्मिती व्हायची. घरातील अबाल वृद्धांचे या शेणा-मातीमुळे शारीरिक स्वास्थ मजबूत असायचे. मागील दशकाअगोदर गावाकडील या सडा-सारवण्याच्या संस्कृतीचा वारसा जपून होता. हल्ली गावोगाव-खेडोपाडी सिमेंटचे घर तयार होत आहेत. आकर्षक रंगरंगोटी करून छते सजवल्या जात आहे.

मात्र जो आभाळभर मायेचा ओलावा या अंगणातील सडा व घरातील सारवणामध्ये होता तो या सिमेंटच्या जंगलामध्ये दिसून येत नाही. ज्यांनी या गावाकडील मातीची अन संस्कृतीची अनुभूती घेतली ते कधीच विसरू शकत नाही, कारण खेड्यातील हे वैशिष्ट्यपूर्ण जगणं जरी साधं असलं तरी उच्चकोटीचा आनंद देणारे, उल्हासदायी व सुगंधी मातीच्या सहवासातील मायेच्या ओलाव्यातील होते. मित्रांनो, संस्कृतीचा वारसा जपणारं हे संस्कारशील जगणं बदलत्या काळानुसार फक्त तुम्हांला पुस्तकात वाचायला भेटेल. ज्या पिढीने प्रत्यक्ष अनुभवलं. त्यांच्या हृदयाच्या कोपऱ्यात आठवणीच्यारुपाने अगदी खोलवर साठवलेलं आहे. ही अनुभूती कदाचित भविष्यात शक्य नाही. हे येणाऱ्या पिढीसाठी फक्त इतिहास असेल, मात्र प्रत्यक्ष सोनेरी क्षणांची अनुभूती मुळीच नाही.

## रमजान

नमाज अदा कराया
बोलविते ते अजान
मुस्लिमधर्मात खास
पवित्र मास रमजान

नित्य नियमात करा
कुराणशरीफ वाचन
आचरणा ये विचार
चित्त शुध्द हो वचन

रोजे कडक दिसभर
मग करी सहभोजन
जाती धर्मा विसरून
द्यावे सर्वा आलिंगन

समता न्यायउदारता
पैगबरांची शिकवण
समस्त विश्वकल्याण
स्नेह बंधुत्व आवरण

उपवासे चित्त शुद्धी
वर्ज करी पाणी अन्न
भुकेल्या घास भरवा
अल्लाह होई प्रसन्न

दानधर्म पवित्र काम
पंचतत्वे सांगे कुराण
जकात देता गरीबां
मानवतेची खरीजाण

इबादतीत पुण्यवर्धन
मनुष्य जन्म हा धन्य
हजयात्रा घडो एकदा
जीवन होई सुसंपन्न

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

## चिऊताईचे अस्तित्व आज धोक्यात, या चिमण्यांनो परत फिरा रे..

चिमणी हा चिमुकला जीव दुर्मिळ होत चालला आहे आणि म्हणूनचं चिमण्यांच्या संवर्धनासाठी आणि निसर्गचक्रातील तिच्या अस्तित्वाचे महत्त्व प्रतिपादन करण्यासाठी, समाजात जनजागृती करण्यासाठी २० मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिन म्हणून साजरा केला जातो.



लहान बालकाला अगदी त्याच्या अन्नग्रहणाच्या विधीपासून जर कुठल्या पक्षाची ओळख आपण करून देत असू तर तो पक्षी म्हणजे चिमणी होय. लहान बालकांसाठी ती चिऊताई म्हणून परिचयाची असते. कावळ्याच्या तुलनेत चिऊताई नेहमीचं प्रामाणिक, सालस, आणि मायाळू म्हणून मुलांच्या मनावर प्रतिबिंबित केली गेली आहे. चिऊताई आणि तिची पिलं यांच्यातील वात्सल्य भाव आई आपल्या मुलाला घास भरवितांना नेहमीचं जगत आणि बालकाला जगवतं आली आहे. परंतु अशा या चिऊताईचे अस्तित्व आज धोक्यात आले आहे.

पशु पक्षांच्या अधिवासाचे स्थान असलेली जंगले मोठ्या प्रमाणात नष्ट केली जात आहेत. वास्तविक पाहता पक्ष्यांचे परिसंस्थेतील स्थान महत्त्वाचे आहे. परागीभवन, बियांचे वाहक, कीटक भक्षी, इतर प्रजातींचे खाद्य अशा वेगवेगळ्या भूमिका हे पक्षी निभावत असतात. नैसर्गिक जंगल उभे करण्यामध्ये पक्षांचा हातभार असतो, यामुळे जंगलाचे आरोग्य राखले जाते. परंतु काळाच्या ओघात आधुनिकीकरण आणि औद्योगीकरणामुळे पक्षांचे अधिवास नष्ट होत आहेत. शेतीच्या उत्पादनात दिवसेंदिवस वाढ व्हावी यासाठी मोठ्या प्रमाणात कीटकनाशकांचा उपयोग केला जातो आहे. कीटक तर पक्षांसाठीचे भक्ष्य आहेत. त्यांची कमतरता झाली अथवा ते रासायनिक फवारणीमुळे विषमय झाले असता अशा कीटकांना खाऊन पक्षी मृत पावण्याचे प्रमाण वाढले आहे. शहरात निर्माण झालेली मोबाईल टॉवर्स व तारांची जंगले, विणीच्या हंगामात चिमण्यांना मानवी तंत्रज्ञानातील बाबींचा होणारा त्रास सहन करावा लागत आहे. आज चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. भारतात सगळीकडे सर्वात जास्त संख्येने सापडणारा, विणीचा हंगाम वर्षभर असू शकणारा, माणसाच्या जवळपास राहणारा आणि त्यामुळे नेहमी दिसणारा पक्षी अशी ओळख चिमणीची आहे. चीनने १९५८-६२ च्या दरम्यान चार कीटक मोहीम राबवली. त्यात पिकांचा नाश करणाऱ्या घटकांना नष्ट करायचे ठरवले. यामध्ये चिमणी पक्षाचा समावेश होता. चीनमध्ये सांस्कृतिक क्रांतीच्या काळात सुरू झालेल्या या चिमण्या मारण्याच्या अभियानामुळे चीनमध्ये चिमण्या जवळजवळ संपुष्टात आल्या. ज्याचा परिणाम गंभीर पर्यावरणीय असंतुलनात झाला. पुढची बरीच वर्ष चीनमधील लोकांना उपासमारीला सामोरे जावे लागले. परंतु त्यामुळे पर्यावरणा पुढे उभे राहू शकणारे धोके लक्षात आले. तेव्हा जागतिक स्तरावर झालेल्या विचार मंथनातून चिमणीच्या संरक्षण आणि संवर्धनाचा विचार व्यक्त झाला.

भारतात त्याची सुरुवात नेचर फॉरएव्हर सोसायटीने २० मार्च २०१० मध्ये पहिला चिमणी दिन साजरा करून केली. अन्नसाखळीतील मूलभूत घटका पुरतेच पक्षाचे सृष्टीतील स्थान महत्त्वाचे ठरत नाही तर आपल्या रंग, आकार, ध्वनी आणि गतिमानता या सर्व वैशिष्ट्यामुळे पक्षांनी सृष्टीला बहुरंगी बनविले आहे. म्हणून यांच्या संरक्षणाची, अन् संवर्धनाची आवश्यकता लक्षात घेता विनाशाला कारणीभूत असलेल्या मानवानेचं पक्षी पुर्नसंवर्धनासाठी प्रयत्नशील होणे गरजेचे आहे. चिमण्याच्या संरक्षणआणि संवर्धनासाठी उपाययोजना करणे आणि आपल्या भावी पिढीला कवितेपुरतीच मर्यादित राहिलेल्या चिऊताईची पुनर्भेट घडून आणणे ही मोठी देण ठरेल. तेव्हा चिमणी संवर्धनासाठी कटिबद्ध होऊया आणि अंतर्मनातून साद घालूया...

या चिमण्यांनो परत फिरा रे आपल्या घराकडे बालकांचा एक घास चिऊताई साठी हरवत चाललाय..!!

**– ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी.**
**कागल–कोल्हापूर.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## सोयगाव शहर परिसरात गारपीट आणि मुसळधार पाऊस



**अक्षराज : पुनम परदेशी**

**दि.२०, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** सोयगाव शहर परिसरात वादळी वारा गारपीठ आणि मुसळधार पाऊस पडला. बुधवारी दुपारी ३ वाजेपर्यंत कडक ऊन असतांना अचानक आभाळ भरून आले सुसाट्याचा वारा सुरु झाला. संध्याकाळी ७ वाजता गारपीठ सुरु झाली. गारासह अर्धा तास जोरदार पाऊस पडला. सध्या गहू कापणीवर आलेला असतांना अचानक पडलेल्या गारा व पाऊसामुळे गव्हाचे नुकसान झाले आहे. उभ्या गहू, कापून पेंढ्या बांधून शेतात असलेल्या गव्हाचे तर अतोनात नुकसान झाले आहे. संध्याकाळी शेतकरी ताडपत्री व इतर साहित्य वापरून गहू वाचविण्याचा प्रयत्न करीत होते. हरभरा, ज्वारी व मक्काचे देखील बबन परदेशी महेश चौधरी किशोर सोनवणे नाना चौधरी नाना गवार अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून त्यामुळे पंचनामाचे करण्याची मागणी केली आहे.

नुकसान झाले आहे. त्यामुळे हातातोंडांशी आलेला घास डोळ्यादेखत भिजता पाहून शेतकरी हवालदिल झाला आहे.

## रमजान महिन्यात तरावीह पठन करणाऱ्या हाफिज सुमेर यांना ६५ हजारांचे बक्षीस



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२०, जिंतूर :** पवित्र रमजान महिना सुरू असून कोक गावात मुस्लिम समाजात भक्तीमय व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. पहाटे सहरीनंतर उपवास सुरू करून दिवसभर पवित्र कुराण पठण व नमाज अदा केली जाते. संध्याकाळी इफ्तारनंतर रात्रीच्या तरावीह नमाजमध्ये पवित्र कुराणाचे पठण करण्यात येते.

दरम्यान, जामा मस्जिद, कोक येथे पवित्र कुराणाचे तरावीह पठण मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी उत्कृष्ट पद्धतीने पूर्ण कुराण पठण करणाऱ्या हाफिज सुमेर यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यांना ६५ हजार रुपये रोख बक्षीस देण्यात आले.

तसेच हाफिज बिलाल यांनाही १०,८०० रुपये बक्षीस देऊन गौरविण्यात आले तसेच मशीदचे मोहजन सेवक शेख हनीफ यांना १५ हजाराचे बक्षिस देण्यात आले. हा सत्कार जामा मस्जिद कमिटीचे अध्यक्ष सय्यद मीर, उपाध्यक्ष शमशेर खान पठाण हमीद खान तसेच सदस्य अजिज खान, मुखीद खान, सय्यद इर्शाद आणि शेख इम्रान शेख रियाज यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमामुळे गावात धार्मिक वातावरण अधिक दृढ झाले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## श्रीराम मंदिर आडे येथे श्रीराम जन्मोत्सव सप्ताहला प्रारंभ...



**अक्षराज : कृष्णा श्रावणपाटील**

**दि.२०, दापोली (रत्नागिरी) :** दापोली आडे येथे श्री रामाचे स.न.१९०१ साली प्रतिस्थापना झालेले मंदिर असून प्रति वर्षाप्रमाणे जन्मोत्सव कार्यक्रम सुरू झाला आहे. मंडळाकडून यावर्षीही भव्यदिव्य कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्या निमित्त सर्व रामभक्तांनी कार्यक्रम, व प्रभू रामाच्या दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आमंत्रण करण्यात आले आहे. कार्यक्रम पत्रिका नुसार. दि.१९/३/२०२६ गुढीपाडव्या पासून ते दि. २५/३/२०२६ पर्यंत कीर्तन सोहळ्याचे आयोजन आहे. कीर्तन झाल्यावर, कोकणची शान, डबलबारीचामान प्रमाणे. डबलबारी संगीत भजनाचा कार्यक्रम आहे. श्री सोमजाई देवी प्रासादिक भजन मंडळ, ठाणे-दिवा,विरुद्ध, श्री स्वामी समर्थ संगीत साधना भजन मंडळ भांडुप (मुंबई)यांच्या मध्ये रंगणार आहे.

दि.२६/३/२०२६ सकाळी १०ते दुपारी १पर्यंत श्री राम जन्मोत्सव कीर्तन होईल. नंतर यात्रा व श्रीराम रथ मिरवणूक होईल. २७ तारखेला महाप्रसाद. २९ तारखेला कब्बड्डी स्पर्धा. ३०तारखेला सत्यनारायणाची महापूजा व हळदी कुंकू समारंभ. प्रसंगी स्थानिक कार्यकारी मंडळ अध्यक्ष, संदीप पावसकर, उपाध्यक्ष, प्रीतम मुरुडकर सेक्रेटरी,अमित मुरुडकर, खजिनदार, मंदार संसारे, सल्लागार, शशिकांत मुरुडकर, प्रमोद गुडेकरमुंबई कार्यकारी मंडळ अध्यक्ष, संजीव खोत, उपाध्यक्ष, निलेश मुकादम, सेक्रेटरी, प्रीतम गांधी, प्रीतम खोत, खजिनदार, सुजय वाईगणकर, सल्लगार, पायधूळ पाडलेकर, विश्वास वायंगणकर, यांनी सर्व कार्यक्रम मध्ये उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन केले आहे.

## वारकरी धर्म परिषदेच्या विदर्भ विभागीय अध्यक्षपदी विलास महाराज वाघमारे यांची निवड



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, बुलढाणा :** कीर्तनकार, प्रवचनकार वारक-यांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव कार्यतत्पर असणारे हभप विलास महाराज वाघमारे यांची वारकरी धर्म परिषदेच्या विभागीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. वारकरी धर्म परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष त्यागमूर्ती वासुदेव महाराज शास्त्री यांच्या आदेशावरून सर्वानुमते आज ठराव पारित करून नियुक्ती जाहीर करण्यात येत आहे. वारकरी धर्म परिषदेचे राष्ट्रीय महासचिव प्रबोधनकार अँड.सतीशचंद्र रोठे पाटील, उपाध्यक्ष हभप गोपाल महाराज कचोरे, युवाचार्य विदर्भ प्रदेशाध्यक्ष यांच्यासह धर्म परिषदेच्या राष्ट्रीय आणि विदर्भातील प्रमुख पदाधिका-यांच्या प्रमुख उपस्थितीत १९ मार्चला संपन्न झालेल्या बैठकीमध्ये सर्वानुमते सदर निवड करण्यात आली आहे. हभप वाघमारे महाराजांच्या नियुक्तीमुळे विदर्भातील वारकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून वारकरी, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्वच स्तरावरून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# चवदार तळे सत्याग्रहातून समतेची मुहूर्तमेढ – मुख्यमंत्री फडणवीस



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, मुंबई :** महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाच्या प्रारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समतेचा, सामाजिक न्यायाचा आणि संविधानिक मूल्यांचा पुनरुच्चार करत भेदभावमुक्त समाज घडविण्याचा निर्धार व्यक्त केला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झालेला हा सत्याग्रह केवळ पाण्यासाठी नव्हता, तर मानवतेच्या प्रतिष्ठेसाठीचा लढा होता, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत महाड (रायगड) येथे चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या शताब्दी वर्ष कार्यक्रमाचा आरंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. चवदार तळ्याचे जलशुद्धीकरण आणि परिसराच्या सुशोभीकरणासाठी ५५ कोटी ८० लाख निधी मंजूर करण्यात आला असून या कामांचे भूमी पूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, रोजगार हमी योजना फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले, महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, खासदार सुनील तटकरे, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रवीण दरेकर, महाड नगराध्यक्ष सुनिल कविस्कर, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, विविध विभागांचे अधिकारी, विविध सामाजिक संघटना आणि राज्यभरातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

यावेळी चवदार तळ्याच्या ठिकाणी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करून मानवंदना देण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करत आपल्या भाषणाची सुरुवात करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, १९२३ मध्ये सार्वजनिक पाणवठे सर्वांसाठी खुले करण्याचा कायदा झाला तरी समाजातील काही घटकांनी त्याची अंमलबजावणी रोखली. या अन्यायाविरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेला चवदार तळे सत्याग्रह हा सामाजिक समतेचा क्रांतिकारी टप्पा ठरला. हा संघर्ष केवळ पाणी पिण्यासाठी नव्हता, तर विषमता आणि अस्पृश्यतेच्या व्यवस्थेविरुद्ध उभारलेला मानवतेचा लढा होता.

या सत्याग्रहामुळे देशातील सर्व सार्वजनिक पाणवठे सर्वांसाठी खुले झाले आणि समतेची पायाभरणी झाली. पुढील पिढीपर्यंत हा संघर्षाचा इतिहास पोहोचविण्याची गरज आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी चवदार तळ्याच्या सुशोभीकरणाच्या कामाचा उल्लेख करत, हे ठिकाण स्वच्छ, पवित्र आणि प्रेरणादायी स्वरूपात विकसित केले जाईल, असे सांगितले. तसेच राज्य सरकारतर्फे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

अनुसूचित जातींवरील अत्याचारातील पीडित कुटुंबातील ९८ जणांना शासकीय सेवेत नियुक्ती निर्णय, पीपल्स एज्युकेशन सोसायटीला दिलेला निधी, चैत्यभूमीवरील स्मारकाचे काम, तसेच लंडन व जपानमध्ये बाबासाहेबांच्या स्मृती जपण्यासाठी केलेल्या उपक्रमांचा त्यांनी आढावा घेतला.

याशिवाय, बौद्धगया येथे महाराष्ट्र भवन उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. बाबासाहेबांच्या नावाने लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये अध्यासन स्थापन करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान हक्क दिले आहेत. या संविधानामुळेच भारत प्रगतीच्या मार्गावर आहे. त्यामुळे विषमता आणि अस्पृश्यता संपवून समतामूलक समाज निर्माण करण्याचा संकल्प सर्वांनी करावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले यांनी महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर भव्य 'भीम सृष्टी' स्मारक उभारण्याची सूचना मांडली.

या ऐतिहासिक स्थळाचा जागतिक दर्जाचा विकास करण्यावर भर देण्यात येत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या समानता व सामाजिक न्यायाच्या विचारांवर मार्गक्रमण करत समाजातील एकजूट अधिक मजबूत करण्याचे आवाहन करीत देश आणि राज्याला प्रगतीच्या शिखरावर नेण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचेही राज्यमंत्री आठवले यांनी नमूद केले.

महाड येथील चवदार तळ्याच्या विकासासाठी ५५ कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याचे सांगत रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी हा प्रकल्प शताब्दी वर्षापूर्वी पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला. देशभरातून येणाऱ्या अनुयायांसाठी येथे आधुनिक सुविधा निर्माण करण्यावर भर देत, रायगड येथे 'शिवसृष्टी' आणि महाड येथे 'भीमसृष्टी' उभारुन या ऐतिहासिक स्थळांचा सर्वांगीण विकास करून सामाजिक आणि सांस्कृतिक वारसा अधिक भक्कम करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.

# कलासाधना सामाजिक संस्थेतर्फे राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, नवी मुंबई :** नवी मुंबई येथील 'कलासाधना सामाजिक संस्थेतर्फे' जागतिक महिला दिनानिमित्त' राज्यस्तरीय सिंधुताई सपकाळ नारी शक्ती गौरव पुरस्कार, जीवन गौरव पुरस्कार, व भारत भूषण पुरस्कार वितरण सोहळा सरोवर आनेक्स बँकुट हॉल. सेक्टर ६,कामोठे. नवी मुंबई येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी प्रमुख पाहुने म्हणून पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, कामोठे पोलिस ठाण्याच्या वरीष्ठ पोलिस निरीक्षक विमल बिडवे, जेष्ठ सिने अभिनेत्री, संध्या म्हात्रे, भास्कर मयेकर, हेमलता गोवारी (नगरसेविका पनवेल महानगरपालिका) यांच्या हस्ते सपन्न झाला.

या पुरस्कार सोहळ्यासाठी महाराष्ट्रातून ७१५ अर्ज प्राप्त झाले होते, त्यातून विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे, पुरस्कार स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, आकर्षक मेडल व पुस्तक देवून सन्मानित करण्यात आले.आयोजक संस्थेच्या संचालिका मेघा महाजन यांनी सांगितले.कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व सरस्वती देवी, सिंधुताई सपकाळ यांना पुष्पहार अर्पण करून करण्यातआले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदिका अनघा जाधव यांनी केले तर प्रास्तविक श्रीराम महाजन (उपाध्यक्ष) यांनी केले. पुढील मान्यवराना सिंधुताई सपकाळ जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नितीन मोहरीर, रवीन्द्र माहिमकर तसेच भारत भूषण पुरस्काराने विनोद भंगाळे, विपुल गायकवाड, अजय जिरापुरे, मनोहर नडिमेटला, अतिश भडांगे, सुरेश बाविस्कर, संघप्रिय कदम, प्रमिला अखरे, चंद्रकांत फडके, राजन राठोड, राजेश पाडावे, बाळासाहेब सोनावणे, मनोज मकवाना, निखिल पटेल, विकास वाघमारे, सुरेश वाघमारे, रमेश झगडे, दिलीप पवार, सुरेश जाधव यांना सन्मानित करण्यात आले.

सिंधुताई सपकाळ नारी शक्ती गौरव पुरस्काराने, सत्यवती खळदकर, भावना सोनवणे, स्वामी नॅन्सी मुथू, सुचित्रा निजापकर, अर्चना बामणे, पुजा खेडकर, रजनी राजपूत, सुनिता सावंत, मंजिरी डोर्लेकर, नेहा शर्मा, मेघना खाडिलकर, सरिता भोसले,

जानवी प्रभू, प्रतिक्षा शिसोदे, पुष्पलता गावंडे, किशोरी भगत, रोहिणी लोकरे, स्वप्नाली सुप्पया, माधुरी शिनकर, अनु पाटील, प्रतिभा बिस्वास, संगिता भालेराव दौंड, रिना आहेर, दिपाली माने, ज्योती पोहाणे, कल्पना मोरे, मानसी जेजुरकर, पूनम देसाई, निलिमा तुपे, सविता कुंभार, ज्योती देशमुख, सीमा वानखेडे, पल्लवी श्रीरंबेकर, रोझमेरी सॅव्हियो, स्वाती येवले, सीता राजपूत, दर्शना पारेख वरील सर्व मान्यवराना प्रमुख पाहुण्याच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## मांडवे खुर्द शाळेचा बाल आनंद मेळावा उत्साहात

## आनंदी बाजारात चिमुरड्यांची धमाल...



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** भाजी घ्या भाजी ताजी ताजी भाजी, टवटवीत फळे गरमागरम पोहे, साबुदाणा वडे, इडली सांबर, चटकदार ओली भेळ, चटपटीत चणे, थंडगार लस्सी, लिंबू सरबत अशी हाक देत आठवडी बाजाराच्या उत्साही वातावरणा प्रमाणे पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द येथिल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांचा बालआनंद बाजार नुकताच गावातील शाळेच्या आवारात भरविण्यात आला होता. चिमुकल्यांच्या बाल आनंदी बाजार अक्षरशः रंगतदार मेळावाच ठरला. व्यवहारज्ञानाचे धडे गिरवणाऱ्या चिमुरड्यांनी बाजारपेठ गजबजून टाकली होती. बाजाराला ग्रामस्थ व पालकांचा प्रतिसाद मिळाला.

या आनंदी बाजाराचा विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संवाद कौशल्य, विक्री - खरेदीची प्रक्रिया, पैशांचे गणित व टीम वर्क विकसित करणे हा उद्देश असल्याचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व मुख्याध्यापक यांनी सांगितले. मेथी, भोपळा, वांगी, टोमॅटो, रताळी,पेरू, लिंबू,कांदे, गावरान शेवगा ,पालक,शेपू आदी विविध भाज्यांची लहानग्यांनी ग्राहकांशी संवाद साधत भाव केला. तसेच शैक्षणिक साहित्य वस्तुंची माहिती दिली. विद्यार्थी बालकांनी विविध वस्तूंसह खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले होते.

या आनंदी बाजारात शाळेतील विद्यार्थ्यांची जवळपास सतरा हजार रुपयांची उलाढाल झाली.

बाल आनंद मेळाव्यासाठी मुख्याध्यापक सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी ग्रामस्थ व पालक यांनी परिश्रम घेऊन यशस्वी संपन्न केला.

## के.रामलू शाळेचे विध्यार्थी राज्यस्तरीय बी.डी.एस स्पर्धा परीक्षेत १२गोल्ड तर ३३सिल्वर मेडल पटकावले



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२०, कुंडलवाडी :** कुंडलवाडी येथील के. रामलू शाळेतील विद्यार्थ्यांनी ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप इंडिया (कोल्हापूर) च्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ मध्ये आयोजित केलेल्या राज्यस्तरीय ब्रेन डेव्हलपमेंट स्पर्धा परीक्षेत ५०विध्यार्थी या परीक्षेत बसले होते.

नुकतेच राज्यस्तरीय ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप इंडिया कोल्हापूर स्पर्धा परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून त्यामध्ये १२ विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल तर ३३ विद्यार्थ्यांना सिल्वर मेडल मिळाले असून २ विद्यार्थ्यांनी ब्रॉन्ज मेडल पटकावले. दरवर्षी प्रमाणे याही शैक्षणिक वर्षात के.रामलू शाळेतील विद्यार्थी गनरोड आराध्या, पाठक वेदांत, लोणेकर माळसा, परसुरे विश्वजीत, शेख सुफियान, लिमशेट्टे समर्थ, अंकुशकर वेदांत, शिंदे आदित्य, शिरगिरे कार्तिक, खांडरे मारोती, पाटील प्रथमेश, भोसले आरुषी इत्यादी १२ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल मिळाले तर ३३ विद्यार्थ्यांना सिल्वर मेडल मिळाले व २ विद्यार्थ्यांना ब्रॉन्ज मेडल मिळाले ३विध्यार्थीना पार्टिसिपेशन सर्टिफिकेट राज्यस्तरीय ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप स्पर्धा इंडिया (कोल्हापूर)प्रमाणपत्र मिळाले असून या सर्व विद्यार्थ्यांना संध्या पाठक, श्यामला किणीकर या शिक्षिकेने मार्गदर्शन केले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षिकेंचे संस्थापक अध्यक्ष साईरेड्डी ठक्करवार सचिव यशवंत संगमवार संचालिका रमा ठक्कुरवार, प्रिंसिपल जे संभाजी व्हाय प्रिंसिपल एम सपना, शिक्षक, पालक, नागरिकांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

# टाकळी ढोकेश्वर येथिल बनाई देवी यात्रा उत्सवास आजपासून सुरुवात

## यात्रा उत्सवाचा आनंद संयमाने घ्या : संपतराव तराळ

### ● कुस्त्यांची दंगल, बैलगाडा शर्यत, लोकनाट्य तमाशाचे आयोजन...



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील आदर्श गाव टाकळी ढोकेश्वर पंचक्रोशीतील सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान असलेले जागृत देवस्थान ग्रामदैवत माता बनाई देवी यात्राउत्सवाला गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी शनिवार दि.२१ मार्च ते २४ मार्च पासून भक्तीमय वातावरणात सुरूवात होणार आहे. या चार दिवसीय यात्रोत्सवाच्या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक, मनोरंजनाचे अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती यात्रा कमिटीचे अध्यक्ष संपतराव तराळ, उपाध्यक्ष संजय खिलारी (मेजर), अंकुश पायमोडे, विक्रम झावरे,मळिभाऊ रांधवण यांनी दिली.

आज शनिवार दिनांक २१ मार्च २०२६ रोजी फकीर शहावाली बाबांचा संदल कार्यक्रम मोठ्या धुमधडाक्यात दारूगोळ्याची आतषबाजी करण्यात येणार आहे. तसेच परंपरेनुसार रविवार दि. २२ मार्च २०२६ रोजी बनाईदेवी यात्रेनिमित्त सकाळी ८.३० वा काठी मिरवणूक रात्री ७.३० वा. भव्य छबिना मिरवणूक आतिषबाजी आणि रात्री १० वा. नामवंत तमाशा कलावंत राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मंगला बनसोडे सह नितीनकुमार बनसोडे करवडीकर या मराठमोळ्या तमाशा कार्यक्रमाचे आयोजन केले असून सोमवार दि. २३ मार्च २०२६ रोजी मळगंगा देवीची सकाळी ८.३० वा. काठी मिरवणूक दुपारी चार वाजता कुस्त्यांचा जंगी आखाडा, भरविण्यात येणार आहे. रात्री ७.३० वा. भव्य छबिना पालखी मिरवणूक, रात्री १० वा. नामवंत लावणी कलाकार शबनम पुणेकर यांचा फुलवंती ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तर मंगळवार, दि.२४ मार्च २०२६ रोजी मुक्ताई देवीची सकाळी ८ वा. काठी मिरवणूक मुक्ताई देवीच्या यात्रेनिमित्त सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत भव्य बैलगाडा शर्यतींचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

रात्री ८ वा. भव्य छबिना मिरवणूक रात्री १० वा. अमर पुणेकर प्रस्तुत नटखट सुंदरा ऑर्केस्ट्राचा कार्यक्रमाने या ४ दिवसीय यात्रेची सांगता होते. या यात्रोउत्सवात दररोज भव्य मिरवणुकीसाठी मुख्य पारंपरिक पद्धतीने ढोल ताशा सनई पथक व ब्रास बँड खास आकर्षण असणार आहे. यात्रोत्सव असल्या कारणाने गावातील मुख्य प्रवेशद्वारावर तसेच संपूर्ण मंदिरांवर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. टाकळी ढोकेश्वर परिसरातील हा सर्वात मोठा यात्रा उत्सव असल्याने यात्रेमध्ये विविध प्रकारची दुकाने थाटणार असल्याने विविध वस्तू खरेदीचा कार्यक्रम तीन दिवस चालतो.

**अतिरिक्त पोलीस बंदोबस्त**

टाकळी ढोकेश्वर येथिल बनाई देवी यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने आयोजित केलेल्या विविध धार्मिक व इतर कार्यक्रमात पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांच्या सूचनेनुसार यात्रोत्सवाकरीता अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात असणार आहे. यात्रा उत्सव दरम्यान, हुल्लडबाजी करणाऱ्यांसह भुरट्या चोरांवर नजर ठेवण्याची सूचना पथकाला करण्यात आली आहे.

**यात्रा उत्सवाचा आनंद संयमाने घ्या : संपतराव तराळ**



टाकळी ढोकेश्वर मध्ये भरणारा फकिर शाहवली बाबांचा संदल आणि बनाईदेवी यात्रा उत्सव हा महाराष्ट्रातील हिंदू मुस्लिम ऐकण्याचा अनोखा आविष्कार दाखविणारा यात्रा उत्सव असून अठरा पगाड जातीचे लोक यामध्ये सहभागी होऊन आनंद घेत असतात. मात्र या यात्रा उत्सवाचा आनंद संयमाने घ्या या यात्रा काळात जर कोणी गैर कृत्य केले तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. आपले कुलधर्म कुलाचार आपण आनंदाने करावा मात्र, त्याला गालबोट लागू नये असे आवाहन बनाईदेवी यात्रा उत्सव कमेटीचे अध्यक्ष संपतराव तराळ, उपाध्यक्ष संजय खिलारी (मेजर), बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण पायमोडे,अंकुश पायमोडे, मळिभाऊ रांधवण, विक्रम झावरे, प्रशांत झावरे,विकास आल्हाट, प्रसिद्धी प्रमुख पत्रकार वसंत रांधवण व टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# थोडक्यात

## श्री ढोकेश्वर पतसंस्था परिवारातर्फे गणेश लोंढे याचा सत्कार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर गावचे भूमिपुत्र व सध्या चाकण येथील स्थाईक असलेले तरुण युवा उद्योजक गणेश भाऊसाहेब लोंढे यांना उद्योग क्षेत्रातील प्रतिष्ठेचा असलेला स्नो ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणाऱ्या स्नो ग्लोबल विकसित भारत टॉप लीडर पुरस्कार मिळाल्याबद्दल टाकळी ढोकेश्वर येथिल श्री ढोकेश्वर पतसंस्थेच्या वतीने संस्थेच्या मुख्य कार्यालयत गणेश लोंढे यांचा सत्कार करण्यात आला.

श्री ढोकेश्वर ग्रामीण सहकारी पतसंस्थेचे चेअरमन भाऊसाहेब लोंढे यांचे गणेश हे चिरंजीव आहेत. यावेळी संस्थेचे संस्थापक संचालक चंद्रकांत खिलारी,भागुजी झावरे,पाराजी वाळुंज, उद्योजक विजय कटारिया, बन्सी आरोटे, बाळासाहेब रांधवण,अशोकशेठ कटारिया, हरिभाऊ दुधवडे, रामचंद्र रोकडे, काशिनाथ खटके, संस्थेचे व्यवस्थापक प्रशांत पायमोडे व कर्मचारी उपस्थित होते.

## नर्सिंग ऑफिसर्स फाऊंडेशनवर तज्ञ आर्थिक सल्लागार म्हणून भानुदास भोईर यांची नियुक्ती

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.२०, शहापूर (ठाणे) :** मुंबई महापालिकेच्या दि. म्युनिसिपल को-ऑप. बँक लिमिटेड चे संचालक भानुदास भोईर यांची नुकतीच नर्सिंग ऑफिसर्स फाऊंडेशन वर आर्थिक तज्ञ सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नर्सिंग ऑफिसर्स फाऊंडेशन महाराष्ट्र ही संघटना कॉमनवेल्स नर्सेस आणि मिडवाईफ फेडरेशन यांच्याशी संलग्न असुन शासकीय तसेच खासगी क्षेत्रातील वैद्यकीय कर्मचारी, अधिकारी यांचा या संघटनेत मोठा सहभाग आहे. म्युनिसिपल को-ऑप बँक लि. चे महापालिका आयुक्त हे पदसिद्ध अध्यक्ष आहेत तर संचालक भानुदास भोईर हे कर्ज समितीचे अध्यक्ष आहेत,तसेच ते अमृत महोत्सव समितीचे ऊपाध्यक्ष आणि लेखा परिक्षण समितीचे सदस्य आहेत. शहापूर चे भुमिपुत्र असलेले भोईर हे गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई महानगरपालिकेत कार्यरत आहेत. त्यांच्या नियुक्ती बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## बहूमजली ईमारतींना आपत्कालिक जिना, अग्निरोधक यंत्रणा, सेफ्टी ब्लॉकची व्यवस्था बसविण्याची मागणी




**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.२०, शहापूर (ठाणे) :** गेल्या काही वर्षांपासून शहापूर शहर तसेच आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर शहरीकरण आणि नागरिकिकरण झाल्याने बहुमजली इमारतींच्या बांधकामाची परवानगी मोठ्याप्रमाणावर दिली जात आहे आणि रहिवासी इमारत बांधकामाचे पेव जिकडेतिकडे फुटले आहे. मात्र अशा उंच इमारतींमध्ये नगरचना नियमानुसार ऊंच बहूमजली ईमारतीना आपत्कालीन निर्गमय मार्ग जिना व आग्निरोधक यंत्रणा तसेच सेफ्टी ब्लॉक व्यवस्था यंत्रणा कार्यन्वित करावी. त्याच बरोबर इमारतींचे फायर ऑडिट त्वरित केले जावे अशी मागणी शिवसेना (ऊबाठा) च्या वतीने करण्यात आली . या संबधिचे लेखी निवेदन मुख्याधिकारी शिवराज गायकवाड, नगरपंचायत शहापूर यांच्या कडे करण्यात आले आहे. शहापूर शहरप्रमूख विजय देशमूख व यूवा सेना आधिकारी हार्षद राऊत तसेच शहर सचिव बापू भोपत राव जिल्हा सचिव आजित पोतदार व प्रदिप पितळे हे यावेळी उपस्थित होते.

## राहुरीत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई

### १३१ प्रकरणे नोंद, ८० हजारांहून अधिक दंड वसूल



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२०, राहुरी :** राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक १ मार्च २०२६ ते २० मार्च २०२६ या कालावधीत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कडक कारवाई करण्यात आली. मोटार वाहन कायद्यानुसार रॉंग साईडने वाहन चालवणे, विनाहेल्मेट वाहन चालवणे, सीट बेल्ट न लावणे, विना नंबर प्लेट वाहन चालवणे तसेच ट्रिपल सीट अशा विविध प्रकारच्या उल्लंघनांबाबत एकूण १३१ प्रकरणे नोंदविण्यात आली.

या कारवाईतून एकूण ८० हजार ३०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे यासाठी पोलीस प्रशासनाकडून ही मोहीम राबविण्यात आली. सदर कारवाई माननीय पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या आदेशानुसार करण्यात आली. पोलीस निरीक्षक संजय ठेगे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेचे फौजदार भाऊसाहेब आव्हाड, पोलीस हेडकॉन्स्टेबल रमेश दरेकर, संतोष ठोंबरे व बापू फुलमाळी यांनी ही कारवाई पार पाडली.

दरम्यान, नागरिकांना मोटार वाहन कायद्याचे पालन करण्याबाबत, आवश्यक कागदपत्रे जवळ बाळगणे, वैध लायसन्स, नंबर प्लेट तसेच हेल्मेटचा वापर करणे याबाबत पोलीसांकडून सूचना व मार्गदर्शन करण्यात आले.

# पुनर्वसनच्या मागणीसाठी बिना (संगम) व भानेगाववासी एकटवले

- आमरण उपोषणाचा तिसरा दिवस
- शेवटच्या श्वासा पर्यंत लढा देणार-भीवा तांडेकर




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२०, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील भानेगाव ओपन कास्ट कोळसा खाणीत लाखो टन कोळसा उत्पादन होत आहे. मात्र, कोळसा खाणीमुळे प्रभावित झालेल्या बिना(संगम) व भानेगावाचे पुनर्वसन मागील ११ वर्षांपासून थंडबसत्यात पडले आहे.

बिना(संगम) व भानेगाव वासी एकटवले असून त्यांनी अभि नही, तो कभी नही या धर्तीवर १८ मार्च पासून बेमुदत आमरण उपोषणाच हत्यार उपसल आहे. आमरण उपोषणाला दोन दिवस पूर्ण झाले असून आंदोलनाला विविध सामाजिक व राजकिय पक्षाचा पाठिंबा मिळत आहे

भानेगाव ओपन-कास्ट कोळसा खाण प्रकल्पासाठी भानेगाव व बिना(संगम) गावातील शेकडो हेक्टर जमिनी वेकोलिने अधिग्रहित केल्यामुळे कोळसा खाण सुरू होण्यापूर्वी प्रभावित झालेल्या गावांचे पुनर्वसन अपेक्षित आहे. मात्र, वेकोलि प्रशासनाच्या गलथान कारभारामूळे मागील ११ वर्षांपासून पुनर्वसन प्रक्रिया रखडली आहे.

भानेगाव ओपन कास्ट कोळसा खाणीत दररोज होणाऱ्या ब्लास्टमुळे बिना (संगम) व भानेगाव परिसरातील घरांना भेगा पडल्या आहेत. येथील नागरिक जीव मुठीत घेऊन जगत आहेत मात्र पुनर्वसन प्रश्न जैसे थे आहे.

बिना (संगम) गाव महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मतदार संघात आहे. बावनकुळे यांनी अनेकदा वेकोलि अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. पुनर्वसन साठी दहेगाव (रंगारी) मौजा रनाळा शिवारातील जागा निश्चित केली, मात्र वेकोलीने पैसे जमा केले नाही.

केंद्रात व राज्यात भाजप मित्र पक्षाची सरकार आहे. सब का साथ सबका विकास नारे देण्यात येत आहे. असे असताना पुनर्वसन प्रक्रियेला वेळ का लागतो आहे? हे समजण्या पलीकडे आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते भीवा तांडेकर यांनी कंबर कसली असून १८ मार्च पासून त्यांनी आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. आंदोलनाचा आज तिसरा दिवस आहे. यासंदर्भात भीवा तांडेकर यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी शेवटच्या श्वासा पर्यंत लढणार असल्याचे सांगितले. त्यामूळे येणाऱ्या काळात आंदोलन चिघळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# प.पू. भगरी बाबा आधार फाउंडेशनतर्फे अत्याधुनिक रुग्णवाहिकेचे लोकार्पण




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, विंचूर (नाशिक) :**

आशिया खंडातील कांद्याची महत्त्वाची बाजारपेठ असलेल्या लासलगावमध्ये सामाजिक कार्याचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे. 'परमपूज्य भगरी बाबा आधार फाउंडेशन' च्या वतीने लासलगावकरांच्या सेवेसाठी एका अत्याधुनिक रुग्णवाहिकेचे लोकार्पण नुकतेच संपन्न झाले. लासलगाव पोलीस स्टेशनचे माजी सहाय्यक निरीक्षक भास्कर शिंदे यांच्या विशेष प्रयत्नातून आणि लोकसहभागातून हा प्रकल्प साकारला आहे.

**लिलावाच्या प्रारंभापासून गो-सेवेपर्यंतचा प्रवास...**

लासलगाव बाजार समितीत कांद्याचा लिलाव हा नेहमीच परमपूज्य भगरी बाबांच्या नामघोषाने सुरू होतो. व्यापारी असोसिएशनच्या छोट्याशा प्रयत्नातून सुरू झालेल्या या फाउंडेशनने आज मोठे स्वरूप धारण केले आहे. लोकवर्गणीतून कोटमगाव येथे गो-शाळा यशस्वीपणे चालवल्यानंतर, आता आरोग्य सेवेसाठी रुग्णवाहिकेचे 'रोपटं' लावले गेले आहे.

**बाजार समिती आणि मान्यवरांचे पाठबळ...**

या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी लासलगाव बाजार समितीचे माजी सभापती व माजी सरपंच जयदत्त होळकर यांनी महत्त्वाची घोषणा केली. रुग्णवाहिकेसाठी लागणारा चालक आणि भविष्यातील देखभालीचा (चरळपींशपरपलश) खर्च लासलगाव बाजार समितीच्या माध्यमातून केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. यामुळे या सेवेचे सातत्य टिकून राहणार आहे.

**मदत आणि सहकार्याचा ओघ**

● प्रकाश दायमा (संचालक, नासिक मर्चंट बँक): फाउंडेशनच्या कार्यासाठी भविष्यात मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

● भास्कर शिंदे (माजी सहाय्यक पोलीस निरीक्षक): यांच्या हस्ते रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले. त्यांनी याकामी घेतलेल्या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

● दीपक पाटील (सहा. पोलीस निरीक्षक, लासलगाव): पोलीस प्रशासनाच्या वतीने कोणतीही मदत लागल्यास ती तत्काळ दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

परमपूज्य भगरी बाबा मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमामुळे लासलगावकरांचे अत्याधुनिक रुग्णवाहिकेचे स्वप्न अखेर सत्यात उतरले आहे. या सुविधेमुळे परिसरातील आपत्कालीन आरोग्य सेवेला मोठी बळकटी मिळणार आहे.